# डॉ. आंबेडकर महाविद्यालय,

## दीक्षाभूमी, नागपूर

# **राष्ट्रीय सेवा योजना**

2018-2019

### **साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन**

दिनांक :१/८/२०१८

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांना साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे त्यांच्या जीवना बद्दल तसेच त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल विद्यार्थांना माहिती व्हावी या करिता महाविद्यालयातून रॅलीचे आयोजन केले होते. ही रॅली अण्णाभाऊ साठे चौकात गेल्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून महाविद्यालयात या रॅलीचे समापण करण्यात आले. या कार्यक्रमात रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, प्रा. सी. पी. फरकाडे, प्रा. राहुल मून, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम, व ८० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.




NSS
डॉ. आंबेडकर महाविद्यालय
NSS
राष्ट्रीय सेवा योजना


डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दिक्षाभूमि, नागपूर
NSS
राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME







अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने अभिवादन रॅली काढण्यात आली.

# परिचय सभा व मार्गदर्शन

दिनांक: २/८/२०१८

डॉ .आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने परिचय सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाविद्यालयात एन.एस.एस. मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांचा परिचय घेऊन त्यांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे जीवनात काय महत्व आहे. याबद्दल माहिती देण्यात आली तसेच रा. से. यो. च्या अंतर्गत वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यात ४७० विद्यार्थी सहभागी झाले होते.



# रक्तदान शिबीर

दिनांक:१०/८/२०१८

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन महाविद्यालयाच्या कुंभारे सभागृहात करण्यात आले होते. या शिबिरात नागपूर मधील मेडिकल कॉलेज च्या रक्तपिढीतील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ३०-३५ विद्यार्थांनी  व प्राध्यापकांनी रक्तदान करून मोलाचे योगदान

दिले



.




## राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन

दिनांक: १०/८/२०१८

दिनांक १ ० ऑगष्ट २०१८ शुक्रवार ला डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून महाराष्ट्र टाइम्स या मराठी वृत्तपत्राचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. सी. पवार, प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक शासकीय कला संस्थेचे डॉ. अनिल बनकर, प्रा. दीपककुमार खोब्रागडे, रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे, महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. अरुण जोसेफ उपस्थित होते.

या उद्घाटन कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हाच की नव्याने एन.एस.एस. मध्ये प्रवेश विद्यार्थांनी राष्ट्रीय घेतलेल्या विद्यार्थांना राष्ट्रीय  सेवा योजनेची माहिती व्हावी, तसेच या मार्फत होणाऱ्या उपक्रमाबद्दल,

समाज सेवेबद्दलची जानीव त्यांना व्हावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमध्ये ४०० विद्यार्थांनी सहभाग घेतला.







DR. AMBEDKAR COLLEGE
NSS
ATIONAL SERVICE SCHEME
राष्ट्रीय सेवा योजना
DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR.



# मातोश्री वृद्धाश्रम आदासा भेट

दिनांक: २३/८/२०१८

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचा अभ्यास दौरा २३ ऑगष्ट २०१८ ला आदासा येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्यात एकूण १५० विद्यार्थांनी आपला सहभाग नोंदविला होता.

आदासा येथील वृद्धाश्रमात एकूण ८४ वृद्ध म्हातारे आहेत त्या सर्व वृधांना एन.एस.एस. च्या विद्यार्थांनी एकत्र जेवण वाढले तसेच फळांचे त्यांना वाटप केले व त्या वृद्धाशी प्रत्यक्ष भेटून संवाद साधून त्यांच्या जीवनातील घटना व प्रसंग तसेच या वृद्धाश्रमात येण्यामागची कारणे यावर चर्चा केली.





मातोश्री वृध्दाश्रम, आदासा, जि. नागपूर
DR. AMBEDKAR COLLEGE
NSS
ATIONAL SERVICE SCHEME
राष्ट्रीय सेवा योजना
WEL-COME







## आंबेडकर कॉलेज एनएसएस कॅम्पची वृध्दाश्रमास भेट

*प्रतिनिधी/ २६ ऑगस्ट*

**नागपूर :** डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा अभ्यास दौरा सेवा योजनेचे अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे यांच्या नेतृत्वात आदासा येथील मातोश्री वृध्दाश्रमास भेट देण्यात आली. या कार्यक्रमाला सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा.सी.पी. फत्रकाडे, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम यांची उपस्थिती होती.

शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या व कुटुंबापासून दुरावलेल्या व मातोश्री वृध्दाश्रमास वास्तव्यास असलेल्या ८४ वृध्दांशी संवाद साधून त्यांची कैफीयत ऐकून घेण्यात आली. यात काही सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी आपली कैफीयत मांडली. तर काही आजीबाईनी स्वतःच्या मुलाने सुनेने आम्हाला आणून ठेवले आणि कधीही आमची चौकशी करण्यासाठी येत नाही, असे सांगितले. मातोश्री आश्रमाच्या व्यवस्थापकाने आश्रमाविषयी पूर्ण माहिती दिली. तसेच काही विद्यार्थ्यांनी वृध्दाश्रमास योग्य ती मदत केली आणि आश्रमाचा निरोप घेतला. यावेळी कुणाल गडेकर, प्रियंका वऱ्हाडे, मयुरी लहाने, कुणाल पाणतावणे, रोशन उईके, या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

ePaper देशोन्नती Mon, 27 August 2018
deshonnati.digitale

## रासेयो विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमाला भेट

डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) विद्यार्थ्यांनी आदासा येथील 'मातोश्री वृद्धाश्रमा'ला भेट दिली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रवींद्र तिरपुडे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. सी.पी. फरकाडे, प्रा. संगीता सोमवंशी, प्रा. रोहिणी मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली हा दौरा पार पडला. डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शासकीय सेवेतून निवृत्त झालेले व घरापासून कुटुंबापासून दुरावलेल्या वृद्धाश्रमात वास्तव्याला असणाऱ्या अशा एकूण ८४ वृद्धांशी संवाद साधला. यावेळी अनेक वृद्धांनी त्यांच्या कौटुंबिक कथा आणि व्यथा व्यक्त केल्या. या दौऱ्यात कुणाल गडेकर, प्रियंका वऱ्हाडे, मयूरी लहाने, कुणाल पानतावणे, रोशन उईके आदी विद्यार्थी दौऱ्यात सहभागी झाले होते.

